## संक्षिप्त



सायबर अवेअरनेस कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी व मान्यवर.

# सणस विद्यालयात सायबर अवेअरनेस कार्यक्रम

**धायरी :** रयत शिक्षण संस्थेच्या नारायणराव सणस विद्यालयात, क्विक हिल फाऊंडेशन व पंख संस्थेच्या वतीने ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी जीवनमूल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. यावेळी जाणीव जागृती कार्यक्रमात अजय शिर्के यांनी मुलांना सायबर गुन्हे, त्यापासून उद्भवणारे धोके आणि त्यापासून दूर कसे राहावे याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी झालेल्या चर्चेत ११वीच्या विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर आधारित विविध प्रश्न विचारले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य शेटे सर , पंख संस्था संचालिका स्मिता आपटे, पोलिस अधिकारी टापरे सर, ननावरे आदी उपस्थित होते.. सूत्रसंचालन श्वेता सूर्यवंशी यांनी केले, तर आभार अनिता चलवादी यांनी मानले. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रकाश सबनीस, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित्त होते .